"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 03, Issue: 01, Jan.-Feb. 2016 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (IIFS) - 0.776

# आदिवासी समाजाच्या सामान्य समस्या

**डॉ. वाय. के. भादे**
सहाय्यक प्राध्यापक,
लोकप्रशासन विभाग,
विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद.

जगातील विविध राष्ट्रांमध्ये आदिवासींचे (अनुसूचित जमाती) वास्तव्य आहे. भारत तर विविध जाती, धर्म व वंशाच्या लोकांनी युक्त असा प्रदेश आहे. भारतीय समाजाचे वर्गीकरण प्रामुख्याने ग्रामीण व नागरी समाजाव्यतिरीक्त आदिवासी समाज या वर्गातही केले जाते. आपल्या सामाजिक व सांस्कृतिक वेगळेपणामुळे आदिवासी समाजाची एक स्वतंत्र ओळख व स्थान आहे. आदिवासींसाठी Tribal व्यतिरीक्त Aborigenes, Indigenous people, First people हे शब्दही प्रचारात आहेत. यास मुळचे लोक किंवा पहिले लोक असे म्हटले जाते.[१]

भारतात ४५० पेक्षा जास्त आदिवासी जमाती आहेत, तर महाराष्ट्रात प्रमुख आदिवासी जमाती १९ आहेत, अल्पसंख्यांक जमाती ३० तर आदिवासी जमातीशी नामसादृश्य जाती-जमाती २८ आहेत. या सर्व जमाती वांशिक, भाषिक व सांस्कृतिकदृष्ट्या एकमेकांपासून भिन्न आहेत. त्यामुळे त्यांच्या समस्याही भिन्न आहेत. वर्तमान काळात राज्याने व्यक्ती विकासासाठी प्रत्येक व्यक्तीस मुलभूत अधिकार व मानवी हक्क प्रदान केलेले असतांना देखील आदिवासी जमातीचे जीवनमान उंचावलेले दिसत नाही. स्वातंत्र्यापूर्वी भारतात आदिवासी विकासाकडे विशेष लक्ष दिले गेले नाही, मात्र स्वातंत्र्य प्राप्तीनंतर घटनात्मक तरतूदी, विविध प्रशासकिय यंत्रणांची निर्मिती, योजना, कार्यक्रमांची निर्मिती करून केंद्र, राज्य, स्थानिक व स्वयंसेवी संस्थाद्वारे आदिवासी समाजास समाजाच्या व विकासाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. विकासासोबतच आदिवासी समाजाचे मूळ सांस्कृतिक वेगळेपण जपण्याचा प्रयत्नही होतांना दिसत आहे. असे असले तरी देशातील नागरी व ग्रामीण समाजाच्या तुलनेत आजही आदिवासी समाज मुख्य प्रवाहापासून अलग असल्याचे चित्र दिसते, ज्यामुळे आदिवासी समाजाचा अपेक्षित विकास झाल्याचे दिसत नाही.

## आदिवासी समाज :

आदिवासी समुदाय हा नागरी व ग्रामीण समुदायापेक्षा भिन्न असा समुदाय आहे. ज्याकरिता भारतीय संविधानात अनुसूचित जमात (Scheduled Tribes) असा उल्लेख केलेले आहे.[२] भारतीय संविधानात

जमात 'Tribe' या शब्दाची व्याख्या केलेली नाही मात्र अनुसूचित जमातीत कोणकोणते समुदाय येतात हे सांगण्यात आलेले आहे. कलम ३३६ (२५) व ३४२ हे अनुसूचित जमाती निश्चित करण्याच्या संदर्भाने असून भारताचे राष्ट्रपती अनुसूचित जमातीच्या यादीत एखादा समुदाय समाविष्ट करू शकतात किंवा त्यातून एखादा समुदाय काढून टाकू शकतात.[३]

अनुसूचित जमातीची संकल्पना स्पष्ट करतांना गिलीन व गिलीन असे म्हणतात की, "एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा परंतु अक्षरओळख नसलेल्या स्थानिक गटाच्या समुच्चयास आदिवासी समाज म्हणतात.[४] तर समाजशास्त्राचे प्रसिद्ध विचारवंत प्रा. डी. एन. मुंजूमदार यांनी अनुसूचित जमातीची संकल्पना स्पष्ट करतांना काही वैशिष्ट्ये सांगितली.[५]

१) मुख्यतः जंगलात, डोंगरदऱ्यात राहणारा, पृथ्थक अंशतः, पृथ्थक समुदाय.
२) विशिष्ट सिमा असलेल्या प्रदेशात विखुरलेला.
३) स्वतःची स्वतंत्र बोलीभाषा व स्वायत्त सांस्कृतिक पद्धती असलेला.
४) नैसर्गिक स्त्रोतांवर अवलंबून असलेला.
५) स्वतंत्र विश्वास, श्रद्धा असणारा व देवदेवतांना मानणारा समुदाय.

थोडक्यात आदिवासी जमातीचे सामाजिक, सांस्कृतिक वेगळेपण या जमातीस इतर समाजापासून वेगळे स्वतंत्र व स्वायत्त अस्तित्व मिळवून देतात. म्हणून आदिवासी समुदायाचे समाजातील वेगळेपण नाकारता येत नाही.

## आदिवासी समाज असलेल्या प्रदेशाचे वर्गीकरण :

आदिवासी समाज संपूर्ण भारतात विखुरलेला आहे. प्रादेशिक दृष्टीकोणातून रॉय बर्मन यांनी भारतीय आदिवासी समुदायाचे पाच विभागात वर्गीकरण केले आहे.[६]

| विभाग | प्रदेश |
|---|---|
| उत्तर पूर्व भारत | आसाम, अरूणाचल प्रदेश, नागालँड, मनीपूर, त्रिपुरा. |
| हिमाचल प्रदेश<br>उत्तर-पश्चिम भारत | उत्तर प्रदेशातील पर्वतीय क्षेत्र, हिमाचल प्रदेश यांचा समावेश हिमाचल क्षेत्रामध्ये होता. |
| मध्य व पूर्व क्षेत्र | पश्चिमबंगा, बिहार, ओरीसा, मध्यप्रदेश, आंध्र प्रदेश |
| दक्षिण भारत | तामिळनाडू, केरळ, कर्नाटक |
| पश्चिम भारत | राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र |

## आदिवासी समाजाची लोकसंख्या

| २००१ च्या जनगणनेनुसार | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जमातीची लोकसंख्या | अ. जमाती लोकसंख्या |
|---|---|---|---|
| भारत | १०२,८७,३७,४३६ | ८,४३,२६,२४० | ८.२० टक्के |
| महाराष्ट्र | ९,६८,७८,६२७ | ८५,७७,२७६ | ८.९ टक्के |

भारतात २००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या ८.२० टक्के इतकी लोकसंख्या आदिवासी जमातींची आहे, तर महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येच्या ८.९ टक्के इतकी लोकसंख्या अनुसूचित जमातीची आहे.[७]

## आदिवासी समाजाच्या सामान्य समस्या :

भारतात केंद्र, राज्य व स्थानिक शासनाद्वारे विविध विभागांच्या अंतर्गत अनुसूचित जमातीच्या विकासासाठी प्रयत्न होतांना दिसतात. मात्र आजही या समाजास विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आदिवासी जमाती डोंगरदऱ्यात राहतात. प्रगत समाजापासून सामाजिक, सांस्कृतिक व भौगोलिकदृष्ट्या अलग जीवन जगत आहेत. या जमातीवर जमातीच्या जीवनशैलीवर आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण, शहरीकरण यांचे आघात होत आहेत. दैनंदिन जीवनात विविध समस्यांना तोंड देत असलेल्या आदिवासी समाजाच्या समस्या आता अधिकच गुंतागुंतीच्या होत आहेत.[८]

### १) सामाजिक व सांस्कृतिक समस्या :

मुलतः आदिवासी जमातीचे सांस्कृतिक जीवन संपन्न होते, त्यांनी नेहमीच आपल्या संस्कृतीचे व जीवन पद्धतीचे संरक्षण व संवर्धन केले. स्वतःच्या अंगभुत कला व स्वायत्त जीवनपद्धती हे आदिवासी जमातीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. आधुनिक काळात मात्र प्रगत व पाश्चिमात्य संस्कृतीच्या आक्रमणामुळे आदिवासी जमातीच्या पारंपारिक संस्कृती व कलांचा ऱ्हास होत आहे. वाढत्या औद्योगिकीकरण व शहरीकरणामुळे आदिवासी युवागृहांचे विघटन झाले, ज्यामुळे या समाजाचे शोषण वाढले आहे. काही जमातीत वाढती लोकसंख्या तर काही जमातीची घटनारी लोकसंख्या ही एक नविनच समस्या समोर येत आहे. सर्वसाधारणतः लोकसंख्या, बेकारी, विस्थापण, व्यसनाधिनता, समाज व संस्कृतीचे विघटन व प्रगत समाजाकडून होणारे अत्याचार या प्रकारच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्या आदिवासी समुहाच्या जीवनात वाढतच आहे.

### २) आर्थिक समस्या :

आदिवासी जमाती मुलतः डोंगरदऱ्यात वास्तव्य करतात. जंगलातील संसाधनावर आधारित आर्थिक

व्यवस्था असलेल्या आदिवासी समाजाच्या जीवनमानाचा दर्जा दिवसेंदिवस घसरत आहे. वन विभागाची कार्यपद्धती, सुपिक जमिनीचा अभाव, बदलती शेती, शेतीचा होणारा ऱ्हास, शेतीपूरक व्यवसायांचा अभाव, विकासाच्या नावाखाली विस्थापन, शहरात मजुरीच्या नावाखाली वेठबिगारी व गुलामगिरी या व अशा अनेक समस्या आदिवासी समाजाच्या आर्थिक जीवनास प्रभावीत करत आहे. परिणामतः आदिवासी समाजास अंगभर वस्त्र, उदरनिर्वाह, निवास या मूलभूत गरजांची पुर्तता करणे देखील अत्यंत अडचणीचे होत आहे.

**३) राजकिय समस्या :**

आधुनिक काळात कायद्याचे राज्य व लोकशाही व्यवस्था प्रस्थापित झालेली असून भारतात स्थानिक पातळीवर पंचायत राज व्यवस्थेचा स्विकार करण्यात आलेला आहे. यामुळे आदिवासी जमातीतील पारंपारिक पंचायतीचा प्रभाव कमी झालेला आहे. एकीकडे कल्याणकारी राजव्यवस्था स्वीकारूनही आदिवासी समाजाकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, पारंपारिक जीवन पद्धतीत प्रशासनाचा वाढलेला हस्तक्षेप यामुळे आदिवासी समुदायात प्रस्थापित व्यवस्थेबद्दल चीड निर्माण होत आहे. परिणामतः विद्रोह, बंड, नक्षलवाद, स्वतंत्र राज्याची मागणी, आधुनिक पंचायत राजची प्रभावहिनता, आदिवासी भागात अशांतता इत्यादी समस्या वाढत आहे.

**४) शिक्षणविषयक समस्या :**

आदिवासी समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी शासकिय पातळीवरून प्रयत्न होत आहेत असे चित्र केवळ वरवर असल्याचे दिसते. अदिवासी समाजात निरक्षरतेचे प्रमाण फार मोठे आहे, तसेच हा समाज शिक्षणाच्या बाबत फारसा जागरूकही नाही. एकीकडे पारंपारिक कला, संस्कृती, लिपी व भाषा यांचा ऱ्हास तर होतच आहे सोबतच शिक्षणाच्या मुलभूत सोयी सुविधांचा अभाव, शिक्षणाचे माध्यम, शिक्षकांचा शिक्षण प्रणालीत स्वयंस्फूर्त सहभागाचा अभाव, विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण इत्यादी समस्यावर कोणतीही उपाय योजना होतांना दिसत नाही. आदिवासींच्या शिक्षणासाठी निर्माण करण्यात आलेल्या आश्रम शाळेच्या कार्यपद्धती व दर्जाबाबत आज प्रश्न चिन्हच निर्माण झाले आहे.

**५) आरोग्य विषयक समस्या :**

अज्ञान, अंधश्रद्धा, शिक्षणाचा अभाव, बदलती जीवन पद्धती यामुळे आदिवासी समाजासमोर विविध आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या आहे. बालमृत्यु, मातामृत्यु, कुपोषण याबरोबरच संसर्गजन्य आजार याचे प्रमाण आदिवासी समुदायात मोठे आहे. शुद्ध पेय जल व आरोग्यविषयक प्राथमिक व मुलभूत सोयी-सुविधांचा अभाव यामुळे आदिवासीच्या स्वास्थांचा दर्जा ढासाळत आहे.

## पायाभूत समस्यांची सोडवणूक न होण्याची कारणे व उपाय योजना :

आदिवासी समाजाच्या समस्या वाढण्याची अनेक कारणे आहेत. मुख्यतः अज्ञान, अंधश्रद्धा या

बरोबरच आदिवासी समाजाचा भोळेपणा, भित्रेपणा, अल्पसंतोषी वृत्ती, असंघटीतपणा, शिक्षणाकडे पाहण्याचा उदासिन दृष्टीकोन तसेच शासकिय यंत्रणा व इतर संस्थांची आदिवासी समाजाबद्दल असंवेदनशिलता अशा अनेक कारणांमुळे आदिवासी समाजाच्या विकासास ग्रहण लागले आहे.[९]

अनुसूचित जमातीच्या उत्थानाच्या ध्येयाला समर्पित करून घेणारे व अनुसूचित जाती व जमातीचे आयुक्त म्हणून कार्य केलेले डॉ. ब्रह्मदेव शर्मा यांनी आदिवासी समाजाच्या विकासासाठी प्रशासनाने काही बाबींना अग्रक्रम द्यायला हवा असे सांगितले.[१०]

१) आदिवासी समाजाच्या शोषणाचे उच्चाटन करणे.

२) शिक्षण, आरोग्य व जागरण संघटन यांना प्राधान्य दिले पाहिजे.

३) शिक्षण सर्वांपर्यंत पोहचविणे व शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यास अग्रक्रम द्यावा.

४) विभिन्न उपक्रम, योजना यांच्यासाठी निधी उपलब्ध करून देणाऱ्या व योजना राबवणाऱ्या यंत्रणा यांचे एकात्मीकरण करावे.

५) नियोजनाची प्रक्रिया तळापासून सुरू व्हावी असे केल्याने स्थानिक पातळीवरील समस्यांची सोडवणूक होईल. तसेच व्यापक क्षेत्रीय विकास योजनांच्या अंतर्गत त्या त्या क्षेत्रातील समुदायासाठी लघु योजना (मायक्रो प्लॅन) तयार करावे.

६) आर्थिक विकासासाठी शेती, जलसिंचन, उद्योग, दळणवळणाची साधणे, जंगलाअंतर्गत रस्ते व कृषी पुरक व्यवसायास चालना द्यावी.

७) मुलभूत गरजा, पायाभुत सुविधा विशेषतः आरोग्याच्या सुविधांकडे लक्ष द्यावे.

८) सर्व आदिवासी क्षेत्रिय एकात्मिक विकास योजनेखाली असलेल्या योजनाच्या खर्चाचे अंदाजपत्रक विधिमंडळात स्वतंत्रपणे सादर केले जावे.

प्रामुख्याने शिक्षण, मुलभूत गरजांची पुर्तता, प्राथमिक सोयी-सुविधांची उपलब्धता, रोजगार व स्वयंरोजगारांची निर्मिती तसेच आधुनिक पंचायत राजचे बळकटीकरण करून आदिवासी समाजास मुख्य प्रवाहात सामील करून घेण्याचे प्रयत्न शासकिय व निमशासकिय स्तरावरून होणे क्रमप्राप्त आहे. असे करत असतांना आदिवासी जमातीचे पारंपारिक स्वतंत्र, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे संरक्षण व संवर्धन होणे आवश्यक आहे.

## संदर्भ :

१) 'आपले हक्क आणि परिपूर्ती', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, जुलै २०१०, पृष्ठ. क्र.०३.

२) Constitutions of India, Article - 275.

३) शिरसाठ एस. टी., 'आदिवासी विकास व पंचायती राजः पाचव्या अनुसूचित क्षेत्राचं विशेष संदर्भ', अजमेरा सुर्यकांता संपादित 'आदिवासी व ग्रामीण विकास', अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०१०, पृष्ठ क्र. २६.

४) Gelin & Gelin "Notes on the Bhonde Koomurs Journal of Anthropdogical Society, Bombay, 1989, Vol. IP, P. No. 35.

५) शिरसाठ एस. टी., पूर्वोक्त, पृष्ठ क्र. २७.

६) Roy Bramun "Tribes & their country", City Book Society, Calcutta, 1912, P. No. 105.

७) के. सागर, पुणे, २०१०, पृष्ठ क्र. १७.

८) देशमुख सुदर्शन, 'आदिवासी समाजाचे दारिद्र्य', निर्मल प्रकाशन, नांदेड, मे २००७, पृष्ठ क्र. ६९.

९) वैद्य नरेशकुमार, 'जनजातीय विकास मिथक एवं यथार्थ', रावत पब्लिकेशन, दिल्ली, २००३, पृष्ठ क्र. १६१.

१०) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पूर्वोक्त, पृष्ठ. क्र. ३७.

❖❖❖❖